# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
# (सचिवालय)

**<u>प्रस्तावना</u> :-**
**{प्रकल्प विभाग}**

नागपूर महानगरपालिका, नागपूर अंतर्गत मौजा वांजरा येथील ख.क्रं. 24/3 व 24/6 वरील 480 EWS सदनिकांना जाणाऱ्या पोच मार्गाचे मजबुतीकरण व डांबरीकरणाचे कामास्तव मागविण्यात आलेली ई — निविदेतील प्राप्त एकुण दोन निविदांपैकी में. पी. के.कन्सट्रक्शन यांची 25.260 % कमी दराची निम्नतम रु. 24,76,698/- रक्कमेची निविदा मंजुरी प्रदान करुन मे. पी.के. कन्स्ट्रक्शन यांना रु. 30,42,891/- रक्कमेचा कार्यादेश निर्गमित करण्याचा प्रश्न विचारात घेणे.

टिप:- 1) प्रस्तूत कामास सक्षम प्राधिकरणाची तांत्रीक मान्यता क्रं. CE/PWD/TS/278/2022 — 23 दि. 27/02/2022 अन्वये प्राप्त आहे.
2) सदर कामाचा खर्च पद क्रं. A22001330803 अंतर्गत करण्यात येईल.
3) विस्तृत टिप्पणी नस्तीत संलग्न आहे.

## <u>पारीत ठराव</u>

**ठराव क्रमांक :- 399/मनपा/प्रशासक** **दिनांक :- 30/05/2023**

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार दिनांक ०४-०३-२०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार कार्यकारी अभियंता (प्रकल्प), प्रकल्प विभाग यांनी वरील प्रमाणे प्रस्तावीत केल्यानुसार नागपूर महानगरपालिका, नागपूर अंतर्गत मौजा वांजरा येथील ख.क्रं. 24/3 व 24/6 वरील 480 EWS सदनिकांना जाणाऱ्या पोच मार्गाचे मजबुतीकरण व डांबरीकरणाचे कामास्तव मागविण्यात आलेली ई — निविदेतील प्राप्त एकुण दोन निविदांपैकी में. पी. के.कन्सट्रक्शन यांची 25.260 % कमी दराची निम्नतम रु. 24,76,698/- रक्कमेची निविदा मंजुरी प्रदान करुन मे. पी.के. कन्स्ट्रक्शन यांना रु. 30,42,891/- रक्कमेचा कार्यादेश निर्गमित करण्याच्या प्रस्तावास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**हस्ता/-**
**राधाकृष्णन बी. (भा.प्र.से.)**
**प्रशासक**
**नागपूर महानगरपालिका, नागपूर**